# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
विष्णुपूरी, नांदेड

जा.क्र. : परीक्षा/प.नि.का/२०११–१२/734 दि. २२.०६.२०११

परिपत्रक

**वार्षिक अभ्यासक्रमाच्या, प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना समकक्षता देणे बाबत.**

शैक्षणिक विभागाचे परिपत्रक क्र. शैक्षणिक / ०१/ अभ्यासक्रम संधी / २०१०–११ /२८०५, दिनांक ०७.१२.२०१० नुसार जे विद्यार्थी वार्षिक अभ्यासक्रमानुसार प्रथम / द्वितीय वर्षात एटीकेटी प्राप्त करुन द्वितीय / तृतीय वर्षात (सत्रपध्दती अभ्यासक्रमात) प्रवेश घेतलेले असतील किंवा घेतील. तथापि अद्यापही त्यांनी वार्षिक अभ्यासक्रमानुसार प्रथम / द्वितीय वर्षातील सर्व विषय उत्तीर्ण केलेले नसतील अशा विद्यार्थ्यांना त्या वर्षाचे म्हणजेच प्रथम / द्वितीय वर्षाचे सत्र पध्दती अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्र भरुन संबंधीत वर्षाची सत्र पध्दतीनुसार सर्व विषयांची लेखी / अंतर्गत / प्रात्यक्षीक / टर्म वर्क इत्यादी परीक्षा द्यावी लागेल.

तसेच ज्या पदवी पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना यापूर्वीच तीन किंवा तीन पेक्षा जास्त वेळा संधी देण्यांत आलेली आहे किंवा समकक्षता देण्यांत आलेली आहे त्यांना उन्हाळी २०११ ही परीक्षेची शेवटची संधी राहील. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांना संधी वाढवून दिली जाणार नाही. उन्हाळी २०११ च्या परीक्षेच्या संधीनंतरही विद्यार्थी एक वा त्यापेक्षा जास्त विषयात / पेपरमध्ये अनुत्तीर्ण झाल्यास वरील प्रमाणे त्यांना नविन अभ्यासक्रमानुसार सर्व विषयांची लेखी / अंतर्गत / प्रात्यक्षिक / टर्म वर्क इत्यादीची परीक्षा द्यावी लागेल. असे म्हटले होते.

उपरोक्त परिपत्रकान्वये अंमलबजावणी करीत असताना ब–याच विद्यार्थ्यांकडून / महाविद्यालयांकडून / शिक्षक वर्गाकडून सारखी विचारणा होत असल्यामुळे परीक्षा मंडळाच्या दिनांक १६.०६.२०११ च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार —जे विद्यार्थी प्रथम वर्षात एटीकेटी / एफ–एटीकेटी आहेत त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यांत यावा तसेच जे एटीकेटी/एफ–एटीकेटी प्राप्त विद्यार्थी आहेत ते ज्या एका / दोन विषयात नापास आहेत त्यांनी सध्या प्रचलित / नियीमत अभ्यासक्रमास असलेल्या अभ्यासक्रमातील समकक्ष विषयाची परीक्षा देण्यांची खाली दर्शविल्याप्रमाणे एक अंतिम संधी उपलब्ध करुन देण्यांत येत आहे.

१. विद्यार्थ्याचा पदवी (वार्षिक अभ्यासक्रमाच्या) प्रथम वर्षाचा निकाल एटीकटी / एफ–एटीकेटी असा असला पाहिजे. फक्त अशाच विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल.

२. एटीकेटी / एफ–एटीकेटी असा निकाल असलेल्या विद्यार्थ्यास तो ज्या विषयात अनुत्तीर्ण आहे त्याच विषयाच्या समकक्ष विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

३. प्रस्तुत विद्यापीठ २०११–१२ या शैक्षणिक वर्षात बी.ए. / बी.एस्सी. / बी.कॉम. / बी.बी.ए. या अभ्यासक्रमासाठी नविन सत्रनिहाय परीक्षा पध्दती राबवीत असून त्यामध्ये प्रतिसत्र, प्रतिपेपर हा ४० गुणांचा (४० गुणांची एमसीक्यू प्रश्नपत्रिका) राहणार आहे. **हिवाळी परीक्षेत फक्त प्रथमसत्राची व उन्हाळी परीक्षेत फक्त द्वितीय सत्राची परीक्षा राहील.** उन्हाळी परीक्षेच्या निकालानंतरही विद्यार्थी जर कांही विषयात अनुत्तीर्ण असतील तर त्या अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यास आणखीन एक

संधी उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे. त्यास अतिरीक्त परीक्षा असे संबोधले जाणार आहे. ही अतिरिक्तची परीक्षा उन्हाळी परीक्षेच्या निकालानंतर साधारणत: दीड महिन्यांनी होईल.

४. बी.ए. / बी.एस्सी. / बी.कॉम. / बी.बी.ए. च्या वार्षिक परीक्षा पध्दतीतील प्रथम वर्षात एटीकेटी / एफ—एटीकेटी प्राप्त करणा—या विद्यार्थ्यांना उपरोक्त अनुक्रमांक तीन मध्ये दर्शविल्याप्रमाणे नविन सत्रनिहाय अभ्यासक्रमाच्या, प्रथम व द्वितीय सत्राच्या परीक्षेच्या वेळी प्रथम / द्वितीय सत्रातील संबंधीत समकक्ष विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

५. जे विद्यार्थी बी.ए. / बी.एस्सी. / बी.कॉम. / बी.बी.ए. च्या वार्षिक परीक्षा पध्दतीतील अभ्यासक्रमाचे आहेत अशा विद्यार्थ्यांना पदवी प्रथम वर्षाच्या नविन सत्रनिहाय अभ्यासक्रानुसार (४० गुणांची एमसीक्यू परीक्षा पध्दती) संबंधीत समकक्ष विषयाची प्रथम सत्राची परीक्षा द्यावी लागेल. परीक्षा दिल्यानंतर त्याने मिळविलेले गुण त्याच्या पूर्वीच्या गुणपध्दतीप्रमाणे रुपांतरीत (Conversion) करुन निकाल जाहीर करण्यांत येईल.

६. पदवी प्रथम वर्षाचा निकाल एटीकेटी / एफ—एटीकेटी असणा—या विद्यार्थ्यास सध्या अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्राच्या द्वितीय वर्षात प्रवेश देता येईल.

७. जे विद्यार्थी बी.ए. / बी.एस्सी. / बी.कॉम. / बी.बी.ए. च्या वार्षिक परीक्षा पध्दतीतील अभ्यासक्रमाचे आहेत व **ज्यांचा निकाल अनुत्तीर्ण असा आहे** अशा विद्यार्थ्यांना नविन सत्रनिहाय अभ्यासक्राच्या प्रथम व द्वितीय सत्राच्या सर्व विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

८. बी.ए. / बी.एस्सी. / बी.कॉम. / बी.बी.ए. वगळता अन्य पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सध्या अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमातील समकक्ष विषयाची परीक्षा द्यावी. मात्र ही सवलत वरील प्रमाणे फक्त एटीकेटी / एफ—एटीकेटी प्राप्त करणा—या विद्यार्थ्यासाठीच राहील. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना सध्या अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे सर्व विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

९. उपरोक्त प्रमाणे परीक्षा देणा—या विद्यार्थ्याकडून संबंधित महाविद्यालयांनी हमीपत्र घ्यावे. सदर हमीपत्र परीक्षा आवेदनपत्रासोबत जोडणे अनिवार्य असून, हमीपत्राशिवाय परीक्षा आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाही. हमीपत्राचा नमुना या सोबत जोडण्यांत आलेला आहे.

**परीक्षा नियंत्रक**

# हमीपत्र

मी ______________________________

बीए / बीकॉम / बी.एस्सी./बी.बी.ए.या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची परीक्षा दिली होती. त्यात माझा निकाल एटीकेटी / एफ एटीकेटी असून, माझ्या जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्याच्या सर्व नियीमत व अतिरिक्त संधी संपलेल्या आहेत याची मला जाणीव आहे. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमा प्रमाणे समकक्ष विषयाची परीक्षा देण्यास तयार आहे. ही शेवटची संधी असल्याची मला जाणीव असून, सदर परीक्षा दिल्यानंतरही मी परीक्षा दिलेल्या विषयात अनुत्तीर्ण झाल्यास, मी नंतर कोणतीही संधी मागणार नाही व विद्यापीठ नियमाप्रमाणे २०१२–१३ या शैक्षणिक वर्षात मी बी.ए./बी. कॉम./बी.एस्सी./बी.बी.ए. या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची (विद्यापीठाच्या नियमानुसार असलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे) सर्व विषयाची परीक्षा देण्यास बांधील आहे.

विद्यार्थ्याचे नांव व स्वाक्षरी

शिफारस करणा—या प्राचार्याची सही व शिक्का